# महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्या., मुंबई
# नागरिकांची सनद

## महामंडळाच्या कार्यालयांचा तपशील

| अ. क्र. | कार्यालय | पत्ता | दुरध्वनी क्र. | ई-मेल / वेब साईट |
|---|---|---|---|---|
| १ | **मुख्यालय** | नेपियनसी रोड, प्रियदर्शनी पार्क, देना बँक समोर, मुंबई – ४०० ०३६ | ०२२-२३६८५९०९ / २३६१३७८९ / २३६९१०३० | www.msrdc.in |
| २ | **प्रकल्प कार्यालय** | वांद्रे रेक्लेमेशन बस डेपो समोर, के. सी. मार्ग, वांद्रे (प), मुंबई – ४०० ०५० | ०२२-२६४००१९० / २०१ ०२२-२६५५८१७५ / ७६ | vcmd@msrdc.in |
| ३ | **विशेष नियोजन प्राधिकरण कार्यालय** | विशेष नियोजन प्राधिकरण, ११ वा मजला, ए-विंग, शेल्टन सफायर, भूखंड क्र. १८ आणि १९, क्रोमाच्या मागे, सत्र न्यायालयाजवळ, सेक्टर १५, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई – ४०० ६१४ | ०२२-२७५७५७७७ | chiefplanner@msrdc.in |
| ४ | **पुणे** | नवीन प्रशासकीय इमारत, तळ मजला, कॉन्सिल हॉल समोर, पुणे – ४११ ००१ | ०२०-२६०५१७६१ / २६१२०३७३ | msrdc_pune@msrdc.in |
| ५ | **छत्रपती संभाजीनगर** | टी-१८, ज्ञानपिठ कॉम्प टेक्नो पार्क, गरवारे स्टेडियमसमोर, एमआयडीसी, छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००३ | ०२४०-२९८००५४ | cemsrdc@gmail.com semsrdcaurangabad@gmail.com |
| ६ | **नागपूर** | पटवर्धन हायस्कूल जवळ, सिताबर्डी, नागपूर – ४४० ००१ | ०७१२-२५२१९३६ | semsrdc_ngp@rediffmail.com semsrdc@gmail.com |
| ७ | **अमरावती** | डॉ. विजय एन. बोंडे, घर क्र. ७६६, वॉर्ड नं. २४, मांगीलाल प्लॉट, कॅम्प, अमरावती – ४४४ ६०२ | ०७२१-२६६७३४४ | ceamt@msrdc.in |
| ८ | **नाशिक** | ग्रिन बिल्डींग, ३ रा मजला, बांधकाम भवन परिसर, उंटवाडी रोड, नाशिक – ४२२ ००२ | ०२५३-२३१४६७७ | eemsrdccnsk१४@gmail.com |

# महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्या., मुंबई
# नागरिकांची सनद

**(१) प्रस्तावना -**

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची स्थापना शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विकास, क्रमांक खाक्षेस-१०९६/प्र.क्र.८०/रस्ते-८, दि.९ जुलै १९९६ अन्वये करण्यात आली आहे. दिनांक २ ऑगस्ट, १९९६ रोजी महामंडळाची भारतीय कंपनी अधिनियम, १९५६ खाली पब्लीक लिमिटेड कंपनी म्हणून नोंदणी करण्यात आली आहे. महामंडळाची मालकी पूर्णतः महाराष्ट्र शासनाकडे असून शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली महामंडळ येते.

राज्यातील काही निवडक रस्ते, पूल, उड्डाणपूल, सागरी सेतू तसेच जलवाहतूकीच्या प्रकल्पांचे नियोजन, आराखडे बनविणे इ. पायाभूत सुविधा प्रकल्पाशी निगडीत कामे महामंडळामार्फत पार पाडली जातात. बांधकाम व देखभालीची कामे तसेच राज्यातील काही निवडक शहरांमधील एकात्मिक रस्ते विकास प्रकल्पांची कामे महामंडळाकडे सोपविण्यात आली आहेत. त्याखेरीज रस्त्यांशेजारी सोयी सुविधा पुरविणे व महामंडळास नेमून देण्यात आलेली अन्य पायाभूत कामेही महामंडळ पार पाडते.

महामंडळाने हाती घेतलेल्या पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांस अर्थपुरवठा करण्याच्या दृष्टीने पथकर, शासनाने मान्यता दिलेल्या अन्य स्त्रोतांद्वारे मिळणारा निधी तसेच जमिनींचा व्यापारी दृष्टीकोनातून विकास करुन उपलब्ध होणारा निधी ठेवून घेण्याचे अधिकार महामंडळास प्रदान करण्यात आलेले आहेत. प्रामुख्याने खाजगी क्षेत्राव्दारे निधी उपलब्ध करुन घेण्याचे उद्दीष्ट नजरेसमोर ठेवूनच प्रकल्पांचे नियोजन महामंडळाने करावयाचे असून त्या दृष्टीने महामंडळाने कर्जरोखे, कर्ज, पथकर, प्रकल्प चालविण्याच्या बदल्यात कंत्राटदाराकडून उपलब्ध होणारी रक्कम व शासनाच्या अर्थसंकल्पातील तरतूद या स्त्रोताव्दारे विविध प्रकल्पांना आतापर्यंत भांडवल पुरविले आहे.

महामंडळाकडून राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांविषयी माहिती पुढीलप्रमाणे :

**१) <u>प्रगती पथावरील प्रकल्प</u> —**

१. हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृध्दी महामार्ग
२. वर्सोवा - वांद्रे सागरी सेतू
३. मुंबई - पुणे द्रुतगती महामार्ग - मिसिंग लिंक
४. रेवस - रेड्डी सागरी महामार्ग
५. ठाणे खाडी पूल — ३
६. भिवंडी - कल्याण शिळफाटा मार्ग
७. वडपे - ठाणे राष्ट्रीय महामार्ग ३ (नवीन राष्ट्रीय महामार्ग ८४८)
८. प्राचीन मंदिरांचे जतन व संवर्धन

**२) अंमलबजावणी टप्प्यातील प्रकल्प -**

१. विरार-अलिबाग बहु उद्देशीय मार्गिका
२. पुणे चक्राकार मार्ग
३. जालना-नांदेड द्रुतगती महामार्ग

**३) प्रस्तावित प्रकल्प -**

१. महाराष्ट्र द्रुतगती महामार्ग ग्रीड – ५००० कि.मी.
२. नागपूर - गडचिरोली द्रुतगती महामार्ग – १५६ कि.मी.
३. नागपूर - गोंदिया द्रुतगती महामार्ग – १४१ कि.मी.
४. गोंदिया - गडचिरोली द्रुतगती महामार्ग – १०६ कि.मी.
५. नागपूर - चंद्रपूर द्रुतगती महामार्ग – १९५ कि.मी.
६. कोकण द्रुतगती महामार्ग – ३८९ कि.मी.
७. नागपूर - गोवा (शक्तीपीठ) द्रुतगती महामार्ग – ८०२ कि.मी.
८. पुणे - नाशिक औद्योगिक द्रुतगती महामार्ग – १७८ कि.मी.

**४) महामंडळाकडून राबविण्यात येत असलेल्या नाविण्यपूर्ण योजना -**

१. एकात्मिक वाहतूक व्यवस्थापन प्रणाली (ITMS)
२. द्रुतगती महामार्गालगत सौर ऊर्जा निर्मिती
३. वृक्षारोपण व सुशोभिकरण प्रकल्प
४. जलसंवर्धन
५. नवनगरे, नवीन महाबळेश्वर गिरीस्थान
६. राधानगरी अभयारण्य, धरण व सभोवतालच्या क्षेत्राचा विकास

**५) विशेष नियोजन प्राधिकरणांतर्गत क्षेत्र -**

१. रायगड जिल्हयाच्या पनवेल, खालापूर व कर्जत तालुक्यातील १०२ गावे (एकूण ३०८ चौ.कि.मी.)
२. महाराष्ट्र समृध्दी महामार्गावरील एकूण १८ नोडस (नवनगरे) (एकूण २८६.९२ चौ.कि.मी.)
३. साताऱ्या जिल्ह्यातील जावळी, पाटण, महाबळेश्वर आणि सातारा तालुक्यातील एकूण २३५ गावांच्या अधिसूचित क्षेत्रासाठी (एकूण ११४१ चौ.कि.मी.)
४. कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी ह्या तालुक्यातील असलेले अभयारणे व राधानगरी धरण व त्या सभोवतालच्या ८४ गावांच्या क्षेत्राचा इको - पर्यटन क्षेत्र म्हणून विकास करण्यासाठी (एकूण ६७० चौ.कि.मी.)
५. महाराष्ट्रातील एकूण २४०५ चौ.कि.मी. क्षेत्रासाठी महामंडळ हे विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून अधिसूचित

# महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्या., मुंबई
# नागरिकांची सनद

**(२) उद्देश -**

१. नवीन बांधकामे उत्तम गुणवत्तेची, टिकाऊ, सुरक्षित, अत्यावश्यक सुविधायुक्त, सौदर्यपूर्ण व सभोवतालचा परिसर सुशोभित करणारी अशी करणे.

२. रस्ते विकास योजनेतील रस्त्यांची नवीन बांधकामे, सुधारणा, तसेच त्यावरील मोठे पूल, लहान पूल, मो-या यांची बांधकामे उत्तम दर्जाची व सुरक्षित अशी करणे.

३. इमारती, रस्ते व पुलांची नियतकालीक देखभाल व दुरुस्ती उपलब्ध होणा-या निधीतून प्रभावीपणे करणे व सेवा सुविधांचा स्तर उंचावत नेणे.

४. सर्व कार्यालयातून कर्मचारीवर्गाची कर्तव्ये व जबाबदा-या फलकावर जाहिररित्या प्रदर्शित करणे.

५. प्रत्येक कार्यालयात ठरवून दिलेल्या दिवशी व वेळी सर्वसामान्य जनतेची गा-हाणी / तक्रारी ऐकणे व त्यांचे प्रभावीपणे निराकरण करणे.

६. माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत मागितलेली माहिती संबंधितांना विहित मुदतीत उपलब्ध करुन देणे.

७. विभागाच्या कामकाजात सातत्य ठेऊन व आधुनिकता आणून विभागाची लोकाभिमुखता वाढविणे.

८. नागरिकांच्या सनदेस व्यापक प्रसिध्दी देणे.

९. संगणकीकरणाबाबत महामंडळाची सर्व कार्यालये तसेच मंत्रालय यांना नेटवर्कने जोडून आवश्यक माहिती उपलब्ध होण्यासाठी प्रयत्नशील राहणे. विभागाची विविध माहिती www.msrdc.in या वेबसाईटवर अद्ययावत उपलब्ध करणे.

**(३) १) बांधिलकी -**

वरील सर्व कर्तव्ये पार पाडतांना महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ

१. सेवेच्या गुणवत्तेची बांधिलकी ठेवील.

२. सौजन्यपूर्ण व मदतीची वृत्ती ठेऊन कामाचा वेळेत निपटारा करेल.

३. पारदर्शकता व निष्ठा ठेवील.

यासाठी वेळोवेळी कार्यपध्दती, पत्रके नागरिकांच्या माहितीसाठी उपलब्ध करण्यात येतील.

**२) नागरिकांची जबाबदारी -**

१. शासकीय अधिकारी / कर्मचारी यांचेशी नागरिकांची वर्तणूक सौजन्यपूर्वक असावी.

२. नागरिकांकडून आवश्यक असलेली माहिती व कागदपत्रे परिपूर्णरित्या मिळावी.

३. नागरिकांचा प्रतिसाद विकासाला मदत करणारा असावा.

४. विहित केलेल्या कालावधीपेक्षा कमी कालावधीत सेवा पुरविण्याचा आग्रह धरु नये.

५. महामंडळाच्या मालमत्तेची व्यवस्था पाहण्यास सहकार्य करावे.

६. नागरिकांनी स्वेच्छेने अतिक्रमणे दूर करावीत व पुन्हा सरकारी जागांवर अतिक्रमणे करु नयेत.

७. रस्त्यांच्या दोन्ही बाजूंना असणा-या वृक्षराजींचे जतन ही नागरिकांची सुध्दा जबाबदारी राहिल.

८. नागरिकांनी कायदेशीर तरतुदी, नियम, अलिखित संकेत यांचे पालन करावे.

९. नागरिकांनी रस्ते सुरक्षतेच्या अनुषंगाने महामंडळाने वेळोवेळी प्रसिध्द केलेल्या सूचनांचे व निर्देशांचे तंतोतंत पालन करावे की जेणेकरुन नागरिकांचा प्रवास सुरक्षित होवून अपघातांचे प्रमाण अत्यल्प राहील.

# महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्या., मुंबई
# नागरिकांची सनद

**(४) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची रचना -**

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, (मर्या.) हे राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली असून त्याचे पदसिध्द अध्यक्ष मा. मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) हे आहेत व मा. राज्यमंत्री (सार्वजनिक बांधकाम) हे सह अध्यक्ष असून, महामंडळाच्या दैनंदिन व्यवहार, उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालकाकडून त्यांच्या नियंत्रणाखालील अधिका-याकडून केला जातो. अशा अधिका-यांचा तक्ता सोबत जोडलेल्या जोडपत्रक – अ प्रमाणे.

प्रस्तावनेत नमूद केलेल्या सार्वजनिक सेवा महामंडळ पुरवित असते. कामांच्या अंमलबजावणीसाठी सार्वजनिक बांधकाम नियमावली, लेखा संहिता, विनिर्देश, वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रके इ. चे काटेकोरपणे पालन महामंडळाकडून केले जाते.

**१) कार्यपूर्तीचे वेळापत्रक –**

महामंडळ रस्ते, पूल, जलवाहतूक इ. कामे करण्यासाठी निविदा प्रक्रियेमार्फत काम सोपवित असल्यामुळे संबंधित कामाच्या संबंधित निवेदेतील कालमर्यादेप्रमाणे कार्यपूर्ती करण्यात येते.

**२) माहितीची सुलभता –**

महामंडळाच्या वेबसाईटवरुन (संकेत स्थळावरुन), तसेच वेळोवेळी प्रसिध्द केल्या जाणा-या पत्रकांव्दारे जनतेला आकडेवारीचा तपशील सुलभतेने उपलब्ध होईल.

**३) खाजगीकरण –**

विशेषतः शहरी भागाच्या विकास कामासाठी महामंडळाने विकास कामांमध्ये खाजगी क्षेत्राचा सहभाग बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर सुरु केला आहे. यामुळे विकास कामासाठी अधिक विकास निधी उपलब्ध करणे शक्य होणार आहे. कार्यक्रमाची परिणामकारकता, जनतेचे अभिप्राय इ. चा अभ्यास करुन पुढील दिशा व धोरण ठरविले जाईल.

**(५) वाहतुकीस सुरक्षित रस्ते –**

रस्त्यांची सुरक्षितता वाढविण्यासाठी शासनाने (सार्वजनिक बांधकाम विभागाने) अपघात निवारण समिती स्थापन केली आहे. ही समिती प्रत्यक्ष पाहणी करुन रस्त्यांवरील अपघात प्रवण स्थळे शोधते व अशा स्थळांची सुधारणा करण्यासाठी उपाययोजना सुचविते.

त्यानुसार समितीने सुचविलेल्या महामंडळाशी संबंधीत स्थळांची सुधारणा टप्प्याटप्प्याने हाती घेण्यांत येते. तपशीलवार व आवश्यक असे माहितीफलक रस्त्यांवर लावले जातील जेणेकरुन रस्ते वाहतुकीस पादचाऱ्यांसह सर्वांना सर्वकाळ सुरक्षित राहतील.

**(६) गाऱ्हाणी / तक्रारी यांचे निराकरण -**

कार्यपूर्तीस होणारा विलंब वा अन्य काही गा-हाणी महामंडळाबाबत अथवा काही कामाबाबत असतील तर, त्यासाठी नागरिकांनी ज्या विशिष्ट कार्यालयाविरुध्द गा-हाणे /तक्रार असेल त्या कार्यालयाच्या वरिष्ठ कार्यालय प्रमुखाकडे तक्रार नोंदवावी अशा गाऱ्हाणे / तक्रारींचे निराकरण वरिष्ठ कार्यालयाकडून १५ दिवसात करण्यात येईल. गाऱ्हाणी समक्ष भेटीत / पत्राने वा ई मेलव्दारेही नागरिक मांडू शकतात. तसेच नागरिकांना माहितीच्या अधिकारांतर्गत महामंडळाशी संबंधीत काही माहिती हवी असल्यास त्यासाठी महामंडळाच्या जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलिय अधिकारी यांची संपूर्ण यादी महामंडळाच्या संकेतस्थळावर 'माहितीचा अधिकार' या शिर्षाखाली उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**(७) नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी -**

या नागरिकांच्या सनदेच्या उपयुक्ततेबाबतचा तथा परिणामकारकतेचा आढावा महामंडळाकडून घेण्यात येईल. ही नागरिकांची सनद सर्वसामान्य नागरिकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असेल व सन्माननीय नागरिकांच्या बहुमुल्य सूचनांचा गांभिर्यपूर्वक विचार करुन, त्यात वेळोवेळी सुधारणा घडवून आणता येईल. ही नागरिकांची सनद स्वतःहून काही नवीन कायदेशीर हक्क निर्माण करीत नाही. मात्र सेवा उपभोगणा-या नागरिकांना जादा हक्क मांडण्यासाठी मदत करते. सनदेस नागरिकांच्या प्रतिक्रिया / अभिप्राय प्राप्त झाल्यास त्यांच्या सूचनांचा यथोचित आदर करुन आवश्यक बदल करण्यात येतील. महामंडळ खात्रीपूर्वक गुणवत्तेची सेवा पुरविण्याची हमी देत आहे. महामंडळ कुठल्याही माहितीसाठी नागरिकांना संवेदनशील, सौजन्यपूर्ण व मदत करण्याच्या भावनेने वर्तणूक मिळेल. कार्यपध्दती अधिक लोकाभिमुख, सुलभ व आटोपशीर करण्यासाठी नागरिकांचा सल्ला घेतला जाईल. भ्रष्टाचारास आळा घालण्यात येईल. तसेच नागरिकांच्या गा-हाण्यांचे कालबध्द निराकरण करण्यात येईल.

****************

# जोडपत्र - अ


Shri. Anilkumar Gaikwad
Vice Chairman & Managing Director
Shri. R. B. Patil
Jt. MD(Engg.I)(I/C)
Shri. Kailas Jadav, I.A.S.
Jt. M.D.(II)
Shri. Manuj Jindal, I.A.S.
Jt. M.D.(III)
Shri. Shreedhar Machha
CFO (I/C)
Shri. Rajesh Nighot,
Shri. S.K.Survase,
Shri. S.R.Bhutada
Chief Engineer
Shri. D.D.Baravkar
Shri Vilas Kamble
SE
EE
DE
Shri. Satish Bhartiya
GM (Admin)
(Comm.)
(Library Documents)
(Repairs and Maintenance)
(Publicity)
AM (HR)
AM (Comm)
A.O.
S.O.
S.O.
P.R.O.
Shri. Jitendra Bhopale
Chief Planner
(SPA)
Shri Uday Chander
Dy. CP
Asso. Planner
Asst. Planner
Planning Asst.
Suryveor
Shri. Prasad Sawant
Company Secretary
Dy. C.S.
Shri Rajesh Katkar
GM( Land-I)
Shri Dattaprasad Nade
GM(Land-II)
DGM (Land)
Manager (L)
AM(Comm.)
Shri. N.D.Toke
CGM (Env.)
S.E. (Env.)
EE (Env.)
AM(Comm.)
Shri. P.W.Budhwani
Law Officer
Leg.Asst.
Shri. Rajesh Nighot
CE (TAD)
EE (TAD)
DE (TAD)
AM(Comm.)
Shri. Satish Bhartiya
GM (Admin) (IT)
EE (IT)
System Administrator